**एस.एस.छल्लाणी प्र.वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालय क्रं. १ यांचे न्यायालय चांदवड.**

**आर. सी. सी. क्रं. ०४/२०२४**
**सरकार वि. शंकर + १.**
**निशाणी– २१.**

**<u>सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. ३ ची जबानी.</u>**
**<u>मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,</u>**
**<u>माझे नाव</u> –** अंबादास रुपचंद गांगुर्डे,
**<u>वय</u>–** ५५ वर्ष– धंदा– शेती.
**<u>राहणार</u> –** कोकणखेड, ता. चांदवड, जि. नाशिक.

.....................................................................................................

**<u>सरकारपक्षाच्या वतीने साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एन. पी. मोरे यांच्या मार्फत शपथेवर सुरु.</u>**

**०१.** दिनांक ११/१०/२०२३ रोजी सकाळी ०८.०० वाजता दरम्यान पैशाच्या कारणावरुन परशराम गांगुर्डे माझ्या घराच्या पाठीमागे पैशासाठी आला होता. मी त्यावेळी त्याला हिशोब देत होतो. त्यावेळी परशराम मोठयाने बोलत होता. त्यानंतर तो शिवीगाळ करत होता. मिराबाई शंकर गांगुर्डे त्यावेळी त्या ठिकाणी आली व बोलू लागली त्या आवाजाने सुनबाई उषा त्या ठिकाणी आली. त्यावेळी सुनबाई उषा हि मिराबाई व परशराम यांना समजावत होती की, ते समजदार व्यक्ती आहे ते व्यवहार बघूण घेतील तुम्ही मध्ये बोलू नका. त्यानंतर त्याचा मिराबाईला राग आला त्यावेळी तिने उषाला लोटले होते व ती खाली पडली व तिला पोटाच्या डाव्या बाजूला लागले. ती त्या वेळी सात महिन्याची गरोदर होती. त्यानंतर लहानू शंकर व सुनिल मोरे त्या ठिकाणी आले व त्यांनी सोडवा सोडव केली. त्यानंतर मुलीला चांदवड येथे सरकारी दवाखान्यात आणले. त्यानंतर पोलिस स्टेशनला तक्रार दिली होती. सरकारी दवाखान्यातून मालेगावला सरकारी दवाखान्यात जाण्यास सांगितले होते. आम्ही मालेगाव येथे सरकारी दवाखान्यात गेलो होतो. मी आरोपींना ओळखतो. आरोपी आज न्यायालयात हजर आहे.

**सरतपास संपला.**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे श्री. व्ही. एस. व्यवहारे वकिल यांच्यामार्फत सुरु.</u>**

**०२.** हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ माझा पुतन्या व आरोपी क्र. २ भावजाई आहे. उषा व किरण च्या लग्नाला ६–७ वर्षे झाले आहे. हे म्हणणे खरे आहे की, लग्न झाले त्यावेळी आरोपीसोबत संबंध चांगले होते. हे म्हणणे खरे आहे की, लग्नाकरीता पैशाची आवश्यकता होती म्हणून परशरामकडून पैसे हातउसणे घेतले होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीचे व माझे शेत बांधाला बांध लागून आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे घराचे बाजूला पोलिस पाटील बबन खैरनार यांचे घर आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे घराच्या पाठीमागून आरोपींचा येण्या जाण्याचा रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, लग्नात हातउसणे घेतलेली रक्कम आरोपी परशराम माझ्याकडे वेळोवेळी परत मागत होता. हे म्हणणे खरे आहे की, मी त्यांना रक्कम परत दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्याचा मला राग आला होता. हे म्हणणे खरे नाही की, सदरची रक्कम आरोपीला देवू लागु नये म्हणून बनाव रचला व आरोपी विरुध्द सुणेने खोटी फिर्याद दिली आहे.

**०३.** हे म्हणणे खरे नाही की, सरतपासात संपुर्ण खोटे कथन केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी शंकरने सुनेला ढकलले व मिराबाई हिने सुनेला हात धरुन पोटावर उजव्या बाजूने पाडले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझी सुन शेती काम करीत असताना पाय घसरुन खाली पडली व तिला मार लागला होता. हे म्हणणे खरे नाही की, कोणतीही घटना घडली नसताना आरोपी विरुध्द खोटी फिर्याद दिली आहे व आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास काही नाही.**

वा. दा. क. केले.

Digitally signed by SUMIT SURESHCHANDRA CHHALLANI Date: 2026.04.09 15:34:26 +0530

**(एस.एस.छल्लाणी)**
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
न्या.क्र.१, चांदवड

समक्ष

Digitally signed by SUMIT SURESHCHANDRA CHHALLANI Date: 2026.04.09 15:34:32 +0530

**(एस.एस.छल्लाणी)**
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
न्या.क्र.१, चांदवड

**दिनांक – ०९/०४/२०२६**